गांवकरी आज ■ रविवार, दि. ५ जुलै २०१५



तपोभूमी टाकळीत बाळासाहेब ठाकरेंचा संकल्प

▸▸ पान ३

# तपोभूमी टाकळीत बाळासाहेब ठाकरेंचा संकल्प

विशेष

॥ सुधीर शिरवाडकर

**श्री** क्षेत्र नाशिक परिसरातील श्री समर्थ रामदास स्वामींची तपोभूमी टाकळी हे केवळ नाशिकचेच नव्हे तर संपूर्ण भारताचे भूषणावह स्थान आहे.

इ.स. १६२० ते १६३२ अशी बारा वर्षे श्री समर्थांनी वयाच्या बाराव्या वर्षापासून टाकळी येथील गोदावरी-नंदिनी नद्यांच्या संगमात कमरेभर पाण्यात उभे राहून सूर्योदयापासून ते मध्यानीपर्यंत पुन्हश्चरण करून चैत्र शु. पौर्णिमा स. १६३३ रोजी (हनुमान जयंती) टाकळी येथेच श्री गोमय मारुतीरायांची प्रतिस्थापना केली.

याच काळात स. १६३० मध्ये शहाजीराजे नाशिक मुक्कामी आले असताना त्यांना श्री समर्थांची महती समजली. श्री समर्थांचा दैनंदिन कार्यक्रम ऐकून, त्यांच्या संबंधीचे सर्व वृत्त समजल्यावर श्री समर्थांशी विचारविनिमय करण्यासंबंधी खूप उत्सुकता निर्माण झाली. शहाजीराजे आपल्या निवडक सरदारांसह टाकळी येथे श्री समर्थांना भेटण्यासाठी आले. ही बातमी

श्री समर्थांना समजली. त्यावेळी ते टाकळी येथे एका घळीत राहत होते. (आजही ती घळ जतन करण्यात आली आहे) त्या घळीतून श्री समर्थ बाहेर आले. शहाजीराजांना सामोरे जाऊन त्यांचे स्वागत केले. त्यांना घेऊन आपल्या घळीत आले. प्राथमिक विचारपूस झाल्यावर दोघांची सद्यस्थितीवर खूप वेळ चर्चा झाली. सखोल विचारविनिमय झाला.

जेव्हा दोन हस्ती विचारविनिमय करतात तेव्हा ते पाऊस पाण्यावर गप्पा न मारता ते समाज, देश, धर्म, समाज उन्नती, धर्म, देश उन्नती या संबंधीच चर्चा, विचार करीत असतात. त्याप्रमाणे दोघांची खूप विचारांची देवाणघेवाण झाली. दोघेही संतुष्ट मनाने घळीबाहेर आले.

शहाजीराजे म्हणाले, ''स्वामी, आजचा दिवस आमच्या नित्य स्मरणात राहील. आपल्याशी गुजगोष्टी केल्या, बहुत समय गुज केले. अंतर स्वस्थ्य झाले. निरोप असावा.'' राजांनी विनम्र भावे वंदन केले. श्री समर्थ उत्तरले, 'यशवंत व्हा. कीर्तिवंत व्हा.' अशा रितीने स्वराज्याचा उगम टाकळी घळीतच झाला.



या तपोभूमीचे महत्त्व जाणून टाकळी मठाचे द्वितीय मठाधिपती श्री भीमस्वामींना श्रीमंत बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशव्यांनी संपूर्ण टाकळी गाव देवस्थानाच्या व्यवस्थेसाठी धनत्रयोदशी, साल १७५३ रोजी इनाम म्हणून दिले. इनामपत्र उपलब्ध आहे.

हा सर्व प्रपंच सांगण्याचे कारण की, अशा प्रसंगांची पुनरावृत्ती पुन्हा एकदा झाली. नोव्हेंबर, डिसेंबर १९६९ चा काळ. टाकळी तपोभूमीची, मठाची, गोमय मारुती मंदिराची अतिशय दैन्यावस्था झाली होती. दैनंदिन पूजाअर्चा, दिवाबत्ती, सण-उत्सव सर्व बंद झाले होते. एक भयाण शांतता सगळीकडे पसरली होती. अनेक गैरव्यवहार सुरू झाले होते.

टाकळी मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी, श्री समर्थांच्या शिकवणीचा, विचारांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी गैरव्यवहार थांबविण्यासाठी थोडक्यात टाकळी मंदिरास पुर्नवैभव प्राप्त करून देण्यासाठी नाशिक परिसरातील श्री समर्थाभिमानी मा. दादासाहेब पोतनीस, वि. मा. दी. पटवर्धन, हरिभाऊ शेलार, डॉ. के. वि. मुळे, डॉ. दादासाहेब केळकर, सावकार मिरजकर, लिलाताई रहाळकर, पांडुरंग गायकवाड आणि सुधीर शिरवाडकर हे सर्वजण यशवंत प्रेस, नाशिक येथे तीन-चार वेळा एकत्र आले. दादासाहेब पोतनीसांच्या अध्यक्षतेखाली मीटिंगा झाल्या आणि सर्वानुमते असे ठरले की वरील सर्व उद्दिष्टे साध्य करण्याकरिता ''श्री समर्थ रामदास सेवा मंडळाची'' स्थापना करावी व त्या माध्यमातून सर्व कार्य करावे. त्याप्रमाणे २३ जानेवारी १९७० रोजी मा. दादासाहेब यांच्या अध्यक्षतेखाली मंडळाची स्थापना झाली.

मंडळाच्या कामानिमित्त वि. मा. दि. पटवर्धनांना भेटण्यास सुधीर शिरवाडकर गेले असताना बोलण्याच्या ओघात वि. मा. दिंनी सांगितले, शिवसेना स्थापन्याचा आधीचा काळ मा. बाळासाहेबांच्या मनात अनेक विचार येत होते. त्यांना मराठी माणसासाठी, महाराष्ट्रासाठी, मराठी माणसाच्या उन्नतीसाठी, त्याने ताठ मानाने उभे राहण्यासाठी काहीतरी करावे असे सारखे वाटत होते. विचारविनिमय सुरू होता. त्या काळात बाळासाहेबांच्या आणि वि. मा. दिं. च्या अनेक वेळा बैठका झाल्या. बाळासाहेब बऱ्याच वेळा वि. मा. दिं च्या घरी आले. विचाराला रूप आले, कार्याची रूपरेषा ठरली. नंतर वि. मा. दि. पटवर्धन दादासाहेब पोतनीस, माधवराव लिमये, देवनंदन दीक्षित, केशव जऊळकर, निवृत्ती बर्वे व इतर समविचारांच्या व्यक्तींशी चर्चा होऊन सर्व विचारांना मूर्त स्वरूप देण्यात आले.

पुढे वि. मा. दिंनी सांगितले की, या ध्येयाच्या बांधणीसंबंधी विचाराने संमती झाल्यानंतर वि. मा. दि. व बाळासाहेब एक दिवस टाकळी येथील

श्री. समर्थांच्या घळीत गेले त्यांनी आपला संकल्प श्री मारुतीरायांसमोर व श्री समर्थांसमोर मांडला. या श्रींच्या कार्यास आशीर्वाद मागितला.

पुढे वि. मा. दि. म्हणाले ''कित्येकांना माहिती नाही की शिवसेनेचा जन्म तपोभूमी टाकळीत झाला.'' यानंतर सुद्धा वि. मा. दि, बाळासाहेब, मातोश्री मीनाताई टाकळीस दर्शनास आले होते.

अशा या सत्कार्यांसाठी अथक परिश्रमाने सतत ४२ वर्षे कायदेशीर प्रकरणाचा पाठपुरावा करून उच्च न्यायालय, मुंबई आदेशानुसार सर्व देवस्थानीची जंगम व स्थावर मालमत्ता देवस्थानी यांच्या मालकीची जाहीर झाली असून, देवस्थानासाठी स्किम मंजूर करून देण्यात आली व व्यवस्थेसाठी सात विश्वस्तांची नेमणूक झाली अूसन पदसिद्ध जि. न्यायाधीश नाशिक हेच न्यासाचे कायम अध्यक्ष असतील.

आता एकच इच्छा आहे की, शासन सर्व भाविक व विश्वस्तांच्या सहकार्याने या स्थानास पुन्हा वैभव प्राप्त व्हावे.

'जय जय रघुवीर समर्थ'

(विश्वस्त - श्री मारुती देवस्थान आणि राष्ट्रसंत श्री समर्थ रामदास स्वामी मठ, आगर टाकळी)